“ प्रेस नोट ” दिनांक २२/०१/२०२५

## कॉल सेंटर चालवून ऑनलाईन फसवणूक करणा-या आरोपींना अटक केल्याबाबत...

सांताक्रुज पोलीस ठाणेच्या हद्दीत राहणारे फिर्यादी नामे श्री. प्रवीण सोळंकी, रा. ठी. मांगेलवाडी खड्डा, जुहू तारा रोड, सांताक्रूझ (प), मुंबई यांना एका अनोळखी इसमाने कॉल करून तो बजाझीन हॉलिडे ट्रॅव्हल्स कंपनी मधून बोलत असल्याचे सांगून ऑनलाईन लोन मिळवून देतो असे सांगून लोन प्रोसेस करीता फिर्यादी यांचेकडुन रू. २,६०,०००/- अशी ऑनलाइन पध्दतीने पैसे घेवून फिर्यादी यांना लोन मंजूर न करता फसवणूक केली आहे अशी तक्रार फिर्यादी यांनी दिनांक १५/०१/२०२५ रोजी सांताक्रुझ पोलीस ठाणेस दिले वरून गु.र.क्र. ५०/२५ कलम ३१८(४),३१९(२) भा.न्या.सं. सह कलम ६६(सी), ६६(डी) आय.टी. ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हयाच्या तपासात तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी हा पवई प्लाझा, जे व्ही एल आर रोड, पवई, मुंबई येथे असल्याचे निष्पन्न झाल्याने, सदर ठिकाणी दिनांक २१/०१/२०२५ रोजी स्थानिक पोलीसांच्या मदतीने छापा टाकला असता सदर ठिकाणी ०४ महिला व ०३ पुरुष इसम हे कॉल सेंटरद्वारे नागरीकांची ऑनलाईन पध्दतीने फसवणूक करीत असल्याचे निष्पन्न झाले. सदर महिला व पुरुष आरोपींना प्रस्तुत गुन्हयात दिनांक २१/०१/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे.

छाप्या दरम्यान अटक आरोपींकडुन १५ मोबाईल फोन, ०४ लॅपटॉप, ४९ पाकिट एअरटेल कंपनी सिमकार्ड, व्होडाफोन कंपनीचे ०८ सिमकार्ड वापरलेले, ०१ प्रिंटर असा एकूण रु ०४,१५,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा.विषेश पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. सत्य नारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री. परमजितसिंग दहिया, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-९ श्री. दिक्षीत गेडाम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, सांताक्रुझ विभाग श्री. मारुती पंडित, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. वैभव शिंगारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्री. रणजीत आंधळे, पोलीस निरीक्षक श्री. चंद्रकांत कांबळे, सपोनि श्री. तुषार सावंत, पोउनि श्री. विजय सरदेसाई, पोउनि श्री. जितेन गांवकर, सफौ श्री. पाठक, पोह श्री. चाबुकस्वार, पोह श्री. हंचनाळे, पोशि श्री. सुरवसे, पोशि श्री. राणे, पोशि श्री. सावकारे, पोशि श्री. गावडे, पोशि श्री. पाटील, पोशि श्री. दिवाणजी, पोशि श्री. वसावे, पोशि श्री. मुंजवटे, पोशि श्री. काकडे यांनी सदरची कामगिरी पार पाडली आहे.

.......................